
REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 1 | OCTOBER – 2017



## ''दादासाहेब गायकवाडांचे दलितांच्या उध्दाराचे कार्य''

**प्रा. राजेश हिरालाल घोडेस्वार**
**इंदिरा गांधी कला–वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर, जि.नागपूर.**

**प्रस्तावना :**

कर्मवीर भाऊराव उपाख्य दादासाहेब गायकवाडांचा जन्म नाशिक जिल्हयात दिंडोरी तालुक्यातील 'आंबे' येथे महार जातीतील एका शेतकरी कुटुंबात किसनराव व पवळाबाई या दांम्पत्याच्या पोटी १५ आक्टोबर १९०२ रोजीझाला. बालपणी त्यांचा स्वभाव अबोल असून त्यांना व्यायाम व कुस्त्यांचा छंद होता. घरातील धार्मिक संस्कारामुळे भाऊरावांवर धार्मिक व आध्यात्मिक गोष्टींचा पगडा बसला. भाऊरावांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातच पुर्ण झाले. येथील शिक्षणात त्यांना अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागल्याने त्यांच्या बालमनावर अस्पृश्यता व विटंबनेबद्दल तिरस्कार निर्माण झाला. भाऊराव ९ वर्षाचे असतानाच इ.स. १९१२ मध्ये सिताबाई या स्त्रीशी त्यांचा विवाह झाला. परंतू विवाहानंतर कित्येक दिवस मुलबाळ न झाल्याने भाऊरावांनी सिताबाईच्या आग्रहास्तव तिच्याच गीताबाई नामक बहीणीशी विवाह केला. परंतू तिलाही मुलबाळ झाले नाही. भाऊरावांनी चौथी नंतरचे शिक्षण नाशिकच्या सरकारी हायस्कूलमध्ये घेतले. येथेही त्यांना अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले. मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण घेतलेल्या भाऊरावांना नाशिकच्या एक्साइज खात्यात कारकूनाची नोकरी मिळाली पूढे त्यांना नाशिकच्या पोस्ट आणि टेलिग्राफ खात्यातही नोकरी मिळाली. परंतू या नोकरीचा माझ्या समाजाला काय उपयोग? असा विचार करुन भाऊरावांनी नोकरी न करण्याचा निर्णय घेतला. त्याच काळात गावोगावी होणाऱ्या सत्यशोधक ब्राम्हणोत्तर चळवळीचे जलसे ऐकून त्यांच्या मनात विचारांचे वादळ सुरु झाले. अस्पृश्य मुलांनी शिक्षण घेऊन समाजाचे दारिद्रय नष्ट करावे, स्वत:ची उन्नती करावी या हेतुने नाशिकमधील घारपुऱ्यात असलेल्या श्री. शाहू छत्रपती वस्तीगृहाच्या अधीक्षक पदाची जबाबदारी भाऊरावांनी स्विकारली. त्या माध्यमातून त्यांना लोकसेवेची संधी मिळणार होती. ती नौकरी सांभाळताना ते खेडयापाडयातून येणाऱ्या त्यांच्या जातीबांधवांच्या अडचणी सोडविण्याचे काम करीत असत. त्यांच्या या कामाची माहिती डॉ. आंबेडकरांना मिळाली. १९२६ मध्ये डॉ. आंबेडकर नाशिकला आले असताना श्री. शाहू छत्रपती वस्तीगृहात मुक्कामाला होते. त्यांच्या अस्पृश्योद्धार कार्याचा व विद्वत्तेचा भाऊरावांना अभिमान वाटत होता. याचवेळी त्यांनी डॉ. आंबेडकरांना आपले गुरु मानले. ही भेट त्यांच्या जीवनाला कलाटणी व व्यक्तीमत्वाला आकार देणारी ठरली. एकदा नाशिकच्या मुक्कामी डॉ. आंबेडकर गोदावरी नदीवर पोहायला गेले असतांना, ते अत्यंत खोल पाण्यात डुबले तेव्हा भाऊरावांनी डॉ. आंबेडकरांना वाचविले. त्यामुळे डॉ. आंबेडकर नेहमी भाऊरावांचा 'आपला जीवनदाता' असा उल्लेख करीत असे. महार, भंगी, चांभार, गारुडी इ. अस्पृश्य जातीत ऐक्य निर्माण व्हावे

यासाठी त्यांनी जाणीवपुर्वक भंग्याच्या हातचे दुध प्राशन केले. त्यामुळे मेहतर समाजाने त्यांना वाळीत टाकण्याचा निर्णय घेतला. आपल्या बांधवांमधील जातीव्यवस्थेची झापडे दुर करण्याचा भाऊरावांनी प्रयत्न केला. त्यावेळी ऊस उत्पादक अस्पृश्य मालकाला गुळ हा स्पृश्यांच्या हातून तयार करावा लागत होता. ही अनिष्ट रुढी भाऊरावांना पसंद नव्हती. म्हणून त्यांनी स्वत:च्या गुऱ्हाळांतून अस्पृश्यांच्या हातून गुळ तयार करुन घेतला.

'निकोडपाडा' या गावात कोणत्यातरी दुर्धर आजाराने गुरे मरत होती. तेव्हा वरिष्ठ जातीच्या लोकांनी महारांना गुन्हेगार ठरवून त्यांना जबर मारहाण केली. यासंदर्भातभाऊरावांनी सरकारकडे तक्रार करुन योग्य न्यायाची मागणी केली आणि आपल्या अस्पृश्य बांधवांना गुलामगिरीचा प्रतिकार करण्यासाठी संघटीत होण्याचा संदेश दिला. सार्वजनिक विहिरी अस्पृश्यांना खुल्या नसत. यासंदर्भात भाऊरावांनी सरकार दरबारी तक्रार दिली. परंतू त्याचा काहीच उपयोग होत नसल्याचे दिसताच त्यांनी पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे बीज अस्पृश्य बांधवांमध्ये रुजविले.

समाजबांधव, कुटुंबीय यांच्याप्रमाणेच स्वत: भाऊरावांना अगदी लहानपणापासुनच अस्पृश्यतेचे चटके बसले होते. त्यामुळे जातीयतेचा समुळ उच्चाटनासाठी भाऊरावांनी अस्पृश्योद्धाराच्या समाजसेवेचे व्रत हाती घेतले. त्यासाठी वस्तीगृहाच्या अधीक्षक पदाच्या नोकरीचा राजीनामा देऊन आपला संपुर्ण वेळ सामाजिक कार्याला वाहून दिला. डॉ. आंबेडकरांनी महाड येथील चवदार तळयावर सत्याग्रह केला. त्या सत्याग्रहात भाऊरावांचा सक्रिय सहभाग होता. यावेळी सत्याग्रहाबद्दल जनजागृती, प्रचार, प्रसार, मिरवणुकीचे आयोजन व नेतृत्व या कामात भाऊरावांचा पुढाकार होता. काही कारणास्तव डॉ. आंबेडकरांनी हा सत्याग्रह तहकुब केला असता, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत सत्याग्रह हा झालाच पाहिजे. अशी भुमिका घेतल्याने शेवटी डॉ. आंबेडकरांना हा सत्याग्रह करावाच लागला. या सत्याग्रहाच्या यशस्वीतेकरीता सर्वात मोठी जबाबदारी भाऊरावांनी घेतल्यामुळे त्यांना राजकीय, सामजिक, शैक्षणिक क्षेत्रातील अत्याचाराला वाचा फोडण्याची स्फुर्ती मिळाली.

महाड सत्याग्रहानंतर डॉ. आंबेडकरांनी नाशिकच्या 'काळाराम मंदीर प्रवेश सत्याग्रहाला' सुरुवात केली. या सत्याग्रहातही भाऊरावांचा उत्स्फुर्त सहभाग होता. प्रारंभी डॉ. आंबेडकर हे मंदीर प्रवेश सत्याग्रह पुढे ढकलण्याच्या बेतात होते. तेव्हा त्यांना या विचारापासून परावृत्त करएयाचे काम दादासाहेबांनी केल्यामुळे अखेर हा सत्याग्रह सुरु करण्यास संमती दिली. सत्याग्रहाच्या नियोजनाकरीता सत्याग्रह समितीची स्थापना करण्यात आली. त्या सत्याग्रह समितीच्या सचिवपदी भाऊरावांची निवड झाली. सचिवपदी असताना त्यांनी अस्पृश्य वर्गात जागृती, सत्याग्रहाचा प्रचार प्रसार, पत्रव्यवहार, सभेचे आयोजन, मिरवणुकीचे नेतृत्व इ. कामे सांभाळली. ही कामे करताना त्यांना कधी लाठया–दगडांचा मार, तर कधी तुरुंगवास सहन करावा लागला. त्यांच्या सत्याग्रहातील समर्पित वृत्तीमुळेच सत्याग्रहीत संघटन, शिस्त, संयम हे गुण आले होते.

अस्पृश्य हे हिंदु धर्म असुनही ते 'पांडवप्रताप' हा हिंदुचा ग्रंथ वाचू शकत नव्हते. यासाठी भाऊरावांनी मुखेड येथे स्वत:च्या मुख्य नेतृत्वाखाली सत्याग्रह केला. येथील महारांनी चातुर्मासानिमित्य 'पांडवप्रताप' ग्रंथाचे पारायण करुन २३ सप्टेंबर १९३१ या पारायण समाप्तीच्या दिवशी 'पांडवप्रताप' या ग्रंथाची रथातून मिरवणूक काढली. तेव्हा मिरवणूकीतून महारांनी भाऊरावांच्या नेतृत्वाखली 'बैठा' सत्याग्रह सुरु केला. या प्रकाराने चिडलेल्या स्पृश्यांनी भाऊरावांसह सर्व सत्याग्रहांना मारहाण केली. त्यांनी या घटनेचा संपुर्ण तपशील छायाचित्रांसह 'गोलमेज परिषदेला' उपस्थित असलेल्या डॉ. आंबेडकरांना पाठविला. त्यामुळेच डॉ. आंबेडकरांना गोलमेज परिषदेत अस्पृश्यांवरील अत्याचाराविरुध्द दाद मागता आली.

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांना मानवी हक्क मिळावे म्हणून दिर्घकाळ विविध सत्याग्रह केले. परंतू हिंदु समाज अस्पृश्यांना मानवी हक्क कदापी देणार नाही याची प्रचिती आली. यावेळी दक्षिण भारतातील महाराप्रमाणे नाशिक जिल्हयातील महारही मुसलमान धर्म स्विकारण्याच्या बेतात होते. हा प्रकार भाऊरावांनी डॉ. आंबेडकरांच्या लक्षात आणून दिल्यावर 'येवला' येथे १३ ऑक्टो. १९३५ रोजी धर्मांतराची घोषणा करण्यासंदर्भात परिषद घेण्याचे ठरविले. या परिषदेच्या यशस्वीतेकरीता आयोजनापासून ते समाप्तीपर्यंतचा कार्यभार दादासाहेब गायकवाड यांनी सांभाळला होता. या परिषदेतून डॉ. आंबेडकरांनी जी धर्मांतराची

घोषणा केली. त्या घोषणेमागे दादासाहेब गायकवाड हेच होते. यावेळपर्यंत हिंदु धर्म हा आपलाच आहे. हे मानणारे अस्पृश्य एकमेकांना भेटतांना 'रामराम' या शब्दाने अभिवादन करीत असत. परंतू येवला परिषदेत दादासाहेबांनी आपल्या अस्पृश्यबांधवांना आजपासून आपण डॉ. आंबेडकरांना 'बाबासाहेब' या शब्दाने संबोधू आणि यापुढे अभिवादन करतांना रामराम व नमस्कार न म्हणता 'जयभीम' या शब्दाने अभिवादन करावे असे आवाहन केले. या आवाहनानंतर महार बांधव एकमेकांना भेटताना 'जयभीम' या शब्दाने अभिवादन करु लागले.

दलित, वंचित आणि स्त्रीयांच्या उन्नतीचे आणि परिवर्तनाचे अत्यंत प्रभावी साधन म्हणजे शिक्षण होय असे दादासाहेबांचे मत होते. त्यांनी दलितांच्या शैक्षणिक उन्नतीचे कार्य केले. तसेच अंधश्रध्दा निर्मुलनाच्या कार्यालाही हातभार लावला. त्यावेळी महार समाजात दसऱ्याच्या दिवशी हेल्याची हत्या करणे, गोरज मुहूर्तावरील लग्न, ज्ञानमंदिरात मरियाई बसविण्याची कुप्रथा अस्तित्वात होती. याकुप्रथेविरुध्द दादासाहेब गायकवाडांनीप्रत्यक्ष कृतीने व आपल्या विविध भाषणांतून मार्मिक प्रहार करुन अंधश्रध्दा निर्मुलनाचे कार्य केले.

नाशिक येथे अस्पृश्य वर्गाची वसाहत निर्माण करावयाची होती. या वसाहतीच्या निर्मितीसाठी अर्ज, विनंत्याद्वारे त्यांनी सरकारकडे जागेची मागणी केली असता ६ एकर ९ गुंठे जागा प्राप्त झाली. त्यांनी या जागेचा ले–आऊट प्लॅन तयार करुन डॉ. आंबेडकर गृह निर्माण संस्थेची उभारणी केली. या त्यांच्या कल्पकतेवर आज अनेक सहकारी संस्था साकारत आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थेचे जनक दादासाहेब गायकवाड होय.

रा. ब. बुले यांच्या १९३८ च्या ठरावानुसार सार्वजनिक विहिरी सर्व वर्गांना खुल्या असल्या तरी, या सार्वजनिक विहिरी खेडयातील अस्पृश्य वर्गाला खुल्या नव्हत्या. यासाठी अस्पृश्य वर्गाने सतत आंदोलने, निदर्शने, चळवळी व सत्याग्रह केले होते. पण ते निष्प्रभ ठरले. यासाठी दादासाहेब गायकवाड यांनी मुंबई विधीमंडळात सतत आवाज उठविला. दादासाहेब गायकवाड यांनी विधीमंडळात ४ सप्टेंबर १९३७ रोजी सरकारच्या दुय्यम शिक्षणविषयक धोरणावर आवाज उठवितांना अस्पृश्य समाज व इतर मागासलेले वर्ग यांचा मागासलेपणा नाहीसा करण्यासाठी सरकारने प्रयत्न केले पाहिजे, शाळेतील अस्पृश्य वर्गाचे, प्रवेशाचे प्रमाण वाढवायला पाहिजे, सरकारी शाळेतून नोकऱ्या मिळतात म्हणून सरकारने सरकारी हायस्कूल खासगी संस्थांच्या हाती देऊ नये असे आपले दुय्यम शिक्षणविषयक धोरणावर मत मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोकणातील 'खोती पध्दत' नष्ट करून कुळांना जमिनीचे स्वामित्व मिळावे यासाठी मुंबई विधीमंडळात विधेयक मांडले हाते. परंतू सरकारने हा प्रश्न रेंगाळत ठेवल्यामुळे मुंबई विधीमंडळावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये व नंतर मुख्यमंत्र्यांना भेटावयास गेलेल्या सदस्यात दादासाहेबांचा सक्रिय सहभाग होता. १९३९मध्ये मुंबई विद्यापीठात सेल टॅक्स बील मांडण्यात आले होते. या बिलामुळे सर्वसाधारण गोरगरीब समाज जो जाडाभरडा कपडा वापरतो त्यावर त्यांना कर भरावा लागत होता. या बिलाविरूध्द दादासाहेब गायकवाडांनी आवाज उठवून मजूर व शेतकरी वर्गाच्या केविलवाण्या परिस्थितीवर प्रकाश टाकला. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयातून सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. यादृष्टीने दादासाहेब गायकवाडांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत स्वत:ला झोकून दिले. या कामात त्यांना सत्यशोधक चळवळीचा वारसा चालविणाऱ्या क्रांतीसिंह नाना पाटील यांनी मदत केली. जातीय वादाच्या अंतानेच संयुक्त महाराष्ट्र एक होणार यासाठी दोघांनी खेडयापाडयातून दौरे काढून 'एक गाव एक पाणवठा' हे कार्य आयोजित केले. या कार्यक्रमाद्वारे क्रांतीसिंह नाना पाटील व दादासाहेब गायकवाडांनी जातीयवादाचा अंत घडवून आणण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील गरीबांच्या हिताचे लढे सुरू करून मराठवाडयात भुमीहीनांचा लढा सुरू करण्याचा आदेश दादासाहेब गायकवाडांना दिला होता. (१९५३) त्यानुसार दलित फेडरेशनच्या कार्यकर्त्यासह ते कामाला लागले. त्यावेळी आंबेडकरी अनुयायी या लढयात प्रचंड उत्साहाने उतरल्याने भुमीहीनांना जमीन मिळालीच पाहिजे. हा नारा मराठवाडयातील कानाकोपऱ्यात धुमसू लागला. दादासाहेबांनी मराठवाडयातील नेत्यांना बरोबर घेऊन संपुर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. याप्रसंगीची त्यांची भाषणे, मेळाव्याचे आयोजन, प्रचार सभा, वेळप्रसंगी भोगलेला तुरूंगवास, यामुळे या सत्याग्रहाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. सरकारने या सत्याग्रहाची धार बोथट करण्याचा

आटोकाट प्रयत्न केला. परंतू दादासाहेबांच्या नेतृत्वातील हा सत्याग्रह अधिकाधिक तीव्र होत गेला. शेवटी सरकारने अस्पृश्यांना जमिनी देण्याचा निर्णय घेतला. हा दादासाहेब गायकवाडांच्या लढयाचा विजय होता.

१९४७ मध्ये हिंदुस्थानची फाळणी झाली तेव्हा पाकिस्तानात राहिलेला अस्पृश्य समाजावर अत्याचार केले जात होते. याविषयी डॉ. आंबेडकरांनी पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्याकडे तक्रार करुन निर्वासित अधिकारी नेमण्याची विनंती केली तेव्हा भारत सरकारने दादासाहेब गायकवाडांना निर्वासित अधिकारी म्हणून नियुक्त केले. जालंदर, कुरुक्षेत्र येथील निर्वासित कॅम्पमधील निर्वासितांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे संरक्षण व पुर्नवसनाचे कार्य दादासाहेब गायकवाड यांनी केले.

विजापूर जिल्हयात सासनूर या गावात उच्चवर्णीयांनी ११ महारांना कापून काढले. दादासाहेबांना या अत्याचाराची माहिती काळताच तेथे गेले व त्यांनी डि.एस.पी. व कलेक्टरला भेटून सासनूर अत्याचाराची हकीकत सांगितली. विजापुरला जाऊन त्यांनी वाचलेल्या जखमी महारांची भेट घेतली. तसेच घडलेल्या अत्याचाराची बातमी वृत्तपत्रांना दिली. दादासाहेबांच्या या कार्यामुळेच सासनुरच्या दलितांना नुकसान भरपाई व गुन्हेगारांना शिक्षा झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ च्या येवला परिषदेत हिंदु धर्मपरिवर्तनाची घोषणा करुन नागपूर येथे १४ ऑक्टो. १९५६ रोजी बौध्द धर्माची दिक्षा घेण्याचे ठरविले. दिक्षासमारंभाची तारीख व काळ निश्चित झाल्यानंतर त्यांनी या संदर्भात माहिती दादासाहेब गायकवाडांना पत्र पाठवून दिली होती. दिक्षा सोहळयाच्या आयोजनापासून ते यशस्वीतेपर्यंतच्या कार्यात दादासाहेबांचा सहभाग मोलाचा होता. नागपूरच्या भूमीत ज्या १४ एकर जागेत आंबेडकरांनी आपल्या बांधवांसह बौध्द धर्माची दिक्षा घेतली होती. ती जागा दिक्षाभूमी स्मारक उभारण्यासाठी मिळावी ही बौध्द बांधवांची मागणी होती. यासाठी स्मारक समिती स्थापन करण्यात आली होती. दादासाहेब गायकवाड हे या स्मारक समितीचे आजीवन सभासद होते. दिक्षाभूमीत स्मारक उभारण्यासाठी शासनाकडून जागा मिळावी यासाठी दादासाहेब पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांना भेटले आणि आमची मागणी मान्य होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, प्रसंगी सत्याग्रह करू,असा इशारा दिला. दादासाहेबांच्या प्रयत्नाला यश येऊन महाराष्ट्र सरकारच्या रेव्हन्यू खात्याने १२ एकर भूमीचे बक्षीसपत्र त्यांना बहाल केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर दादासाहेब गायकवाडांनी पश्चिम खान्देशात भूमीहीन सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले. धुळे, नंदुरबार, आष्टे, शिरपूर, सावरी, सिंदखेड, शहादा, अकोला, नाशिक याठिकाणी सत्याग्रहाचे लोन पसरले. सत्याग्रहाचा वणवा संपुर्ण महाराष्ट्रात पेटल्याने भुमिहीनांना ४ लक्ष एकर जमीन देण्याचे सरकारने लेखी आश्वासन दिले.

## संदर्भ ग्रंथसुची

१) खैरनार, जे. जे. — सत्याग्रही दादासाहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रकाशन, येवला.
२) गडकरी, माधव — संयुक्त महाराष्ट्र लढयातील महारथी, मनोविकास प्रकाशन, मुंबई.
३) गायकवाड, प्रदिप (संपा.) महाड सत्याग्रह व मनुस्मृती दहन, समता प्रकाशन, नागपूर, २००७.
४) जंजाळ, प्रकाश— भुमिहीनांचा सत्याग्रह, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर , १९६५
५) पोतनीस, महेश (संपा.) — लोकाग्रणी दादासाहेब गायकवाड, भाष्य प्रकाशन, मुबंई, २००७